<u>सं. फौ. ख. क्र.५९/२०१८</u> **निशाणी क्र.२०**

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.३ यांचा जबाब</u>**
**<u>मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,</u>**

नाव — अशोक केशव नागरगोजे,

वय — ५२ वर्षे, व्यवसाय – शेती

पत्ता — रा. साळींबा, ता. वडवणी, जि. बीड.

**<u>सरकारतर्फे सरकारी वकिल श्री. ए. डी. साखरे यांचेमार्फत सरतपास दु.१.४३ वा. सुरुः</u>**

**१.** दिनांक २३.०३.२०१८ रोजी मी साळींबा येथे होतो. त्या दिवशी शिंदे पोलीसांनी मला फोन लावुन पुसरा फाट्यावर झालेल्या अपघाताची माहिती दिली होती. त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा करण्यासाठी मला पंच म्हणून हजर राहण्यासाठी सांगितले होते. त्यांनी दिलेल्या माहिती नुसार मी घटनास्थळी गेलो होतो, त्यावेळी तेथे पोलीस शिंदे आणि दुसरे पंच अंगद बळीराम खाडे हे हजर होते. पोलीसांनी माझ्या समक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला, तो मला वाचून व समजावुन सांगितला होता, त्यातील मजकूर खरा व बरोबर असल्यामुळे मी त्यावर सही केली होती. आता मला दि.२३.०३.२०१८ रोजीचा घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला, त्यावर अ.क्र.२ वर माझी सही असून त्यातील संपुर्ण मजकूर माझ्या माहिती प्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी २१** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. पी. एस. उजगरे यांच्यामार्फत</u>**

**२.** हे म्हणणे खरे आहे की, साळींबा हे गाव वडवणी पासून ५ किमी अंतरार आहे. हे म्हणणे खरे आहे की, मृत व्यक्ती, त्याचे आई वडील आणि भाऊ हे आमचे नातेवाईक आहेत. हे म्हणणे खरे नाही की, पुसरा फाटा येथे घटनेच्यावेळी दुकाने अस्तित्वात होती. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ पुसरा फाटा हे बीड–परळी महामार्गावर असून सदर महामार्ग रहदारीचा आहे. घटनास्थळावर इतर किती लोक जमले होते हे मला माहिती नाही. सदर घटनास्थळ मला शिंदे पोलीसांनी दाखविले. घटनास्थळाच्या आजुबाजुला कोणाच्या शेत जमीनी आहेत हे मला सांगता येत नाही.

**३.** पोलीसांनी माझ्या समक्ष घटनास्थळावरुन ट्रॅक्टर आणि दुचाकी वाहन जप्त केले होते. सदर पंचनामा मी स्वतः वाचून पाहिला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळावर गेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मृत व्यक्ती माझा नातेवाईक असल्यामुळे

मी केवळ पोलीस स्टेशनमध्ये जावुन पंचनाम्यावर सही केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष दोन वाहने जप्त केली होती हे मी खोटे सांगितले आहे.

**दु. १.५५ वा. उलटतपास पुर्ण.**

फेरतपास नाही.

**दिनांकः– ११.११.२०२५**

| **समक्ष** | **श्रवणोत्तर निवेदन स्विकृत** |
| --- | --- |
| sd/– | sd/– |
| **(विष्णु द. गिते)**<br>प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,<br>वडवणी, जि. बीड. | **(विष्णु द. गिते)**<br>प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,<br>वडवणी, जि. बीड. |